HGH INDIA® 2021
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
November 30 - December 3, 2021,
INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR
Inspiring Business for 10 years
NEWS 2
A TEXZONE Event
www.hghindia.com
Where business feels at home!

# पहाण्यासारखे आणि रिकनेक्ट होईल असे बरेच काही !

आर्थिक वर्ष २०२१-२२ (जुलै-सप्टेंबर २०२१) च्या दुसऱ्या तिमाहीत तडाखेबंद व्यवसायासह आणि चांगल्या दिवाळी मोसमातील विक्रीसोबत सर्व घरगुती उत्पादने वर्गवारीतील बहुतांशी विक्रेत्यांचा धंदा चांगला राहिला. तसेच यंदा ग्राहकांची मागणीही होती. आगामी काही महिन्यांत आणि अगदी येत्या वर्षात हाच ट्रेंड कायम राहू दे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. बऱ्याच विक्रेत्यांकडे मालच उरला नाही आणि शक्य तितक्या लवकर माल भरण्याकडे त्यांचा कल दिसून आला. उन्हाळा येण्यापूर्वी डिसेंबर महिन्यात घरातील सामान भरून ठेवण्याची लगबग असल्याने हा कालावधी विक्रेत्यांच्या दृष्टीने सुगीचा ठरला आहे.

अशा परिस्थितीत, जवळपास ३०० भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सची उत्पादने आणि निर्माते एचजीएच इंडिया २०२१ मध्ये सहभागी होणार आहेत आणि संपूर्ण भारतातून हजारो व्यापारी खरेदीदारांनी पूर्व-नोंदणीच्या माध्यमातून अगोदरच आपली भेट निश्चित केली आहे. ३० नोव्हेंबर- ३ डिसेंबर २०२१ या कालावधीत इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नॉयडा, दिल्ली एनसीआर येथे १० व्या वार्षिक आवत्तीचे आयोजन करण्यात आले असून घरगुती उत्पादन प्रकारातील व्यापारी खरेदीदार आणि विक्रेत्यांना सध्याची बाजार स्थिती पाहता ही नामी संधी गवसली आहे.

एकंदर सध्या भारतात घराकडे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येते. न्यू नॉर्मल पद्धतीने सर्वांचे लक्ष कौटुंबिक जीवनाकडे आणि घरातच जास्तीत-जास्त राहण्याकडे एकवटून घेतले. अनेक लोक कुटुंबात परतली आणि स्वत:चे घर असण्याकडे त्यांचा कल वाढला आहे. घर बांधणी तसेच घरात डागडुजी करून अद्ययावतीकरण करून घेण्यात अधिकाधिक खर्च लोक करू लागल्याचे चित्र आहे. नव्याने आलेल्या वर्क फ्रॉम होम कल्चरचा अंगीकार, आयष्य जगताना स्वच्छतेच्या महत्त्वावर वाढता भर त्याचप्रमाणे स्वतंत्र घरगुती व्यवस्थापनाने घरात लागणाऱ्या होम फर्निशिंग, टेक्सटाईल, मॅट्रेस, छोटी फर्निचर आणि सजावटीच्या वस्तू, स्वयंपाकघरातील भांडी व उपकरणे तसेच एकंदर घरगुती साधने वर्गवारीने बाजाराला गती दिली. भारतीय ग्राहक बराच रस आणि मेहनत घेऊन घराला अद्ययावत करत आहेत. घराचे देखणेपण, सुलभता आणि आराम जपण्याचा प्रयत्न करत आहेत. घर केंद्रस्थानी असण्याचा हा मेगाट्रेंड बराच काळ टिकणारा आहे, सध्या महामारी-पश्चात काळाची मजा घेणे सुरू आहे. घरात लागणारे उशांचे अभ्रे, पडदे, चादरी, सजावटीच्या वस्तू, घरगुती साधने आणि भेटवस्तूंना हळूहळू मागणी वाढते आहे. रिटेल स्तरावर सध्याची घरगुती उत्पादन प्राधान्ये वास्तविक पोचपावती देणारी ठरत आहेत. मनोरंजनाचा भाग म्हणजे एचजीएच इंडिया 'च्या टीमने भारतभरातील रिटेलर, ब्रँडस आणि निर्मात्यांसमवेत साधलेल्या संवादातून दीर्घकालीन संधी अधिक आश्वासक असल्याचे लक्षात आले.




ही वेळ भारतीय स्थानिक घरगुती उत्पादन बाजारपेठेवर लक्ष केंद्रित करण्याची आहे हे स्पष्ट दिसते. कारण आकारमानासोबतच गुणवत्तेचा उदय झाला आहे. भारतीय कंपन्या या सध्याच्या घडीला परदेशी कंपन्यांवर वर्चस्व गाजवत आहेत. कारण त्या बाजारपेठ, विक्रेते आणि ग्राहकांच्या अधिक जवळ आहेत. आंतरराष्ट्रीय बाजार उपलब्ध असूनही आजच्या तारखेत लॉजिस्टिक समस्या टोकाच्या आहेत. प्रवासावर निर्बंध सुरू आहेत, त्याचप्रमाणे भारतीय बाजारपेठ ही गुंतागुंतीची असल्याने परदेशी निर्माते लक्ष देण्यात कमी पडतात. त्यामुळे काही काळापासून भारतीय कंपन्या त्यांच्या देशी बाजारपेठेबाबत अधिक स्वारस्य राखून आहेत. भारतीय बाजारातील संधी नवीन पायरी गाठत असताना, विक्रेते, ब्रँड्स आणि निर्मात्यांमध्ये घट्ट संगनमत आवश्यक ठरते. वेगवान पुरवठा साखळी आणि विश्वासार्ह वितरण भागीदाऱ्या आवश्यक असतात. एचजीएच इंडिया २०२१ अभिनव संधींची स्थापना करण्यासाठी तसेच भविष्यातील ब्रँड्सना भारतीय बाजार स्थितीत सामील होण्यासाठी आणि नवीन व्यावसायिक भागीदारी प्रवेश उपलब्ध करून देते.

एचजीएच इंडिया २०२१ हा पहिला एकात्मिक घरगुती उत्पादन कार्यक्रम व्यापार खरेदीदार आणि व्यावसायिकांकरिता आहे, जो होम टेक्सटाईल म्हणजे घरात लागणाऱ्या चादरी, उशांची अभ्रे, पडदे इत्यादी, घरगुती सजावटीच्या वस्तू, छोटी फर्निचर, भेटवस्तू आणि घरातील साधनांचे प्रभावी विहंगावलोकन उपलब्ध करून देतो. या व्यापारी कार्यक्रमाची १० वी वार्षिक आवृत्ती ही प्रामुख्याने भारतीय गृह विक्री बाजारपेठेतील नव्याने सुरू होणाऱ्या उन्हाळी मोसमाकरिता नाविन्यता तसेच ताज्या उत्पादनाची साक्षीदार आहे. हे व्यापारी प्रदर्शन व्यावसायिक भेटी देणाऱ्यांकरिता असून इथे कायम प्रदर्शन भरवणाऱ्यांसह अनेक नवीन सदस्य सहभागी होणार आहेत. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये चार दिवसांच्या कालावधीत प्रदर्शन भरविणाऱ्यांना स्थापित व्यवसाय भागीदारांसमवेत संपर्क जोडता येईल, नाविन्य सादर करता येईल, नवीन संधींचा शोध घेता येईल आणि नवीन सर्वोच्च सक्षम व्यवसाय भागीदारांचा शोध घेणे शक्य होईल. सध्याचा ट्रेंड पहाता, एचजीएच इंडियात भारत तसेच १९ देशांमधील ३०० ब्रँडस व निर्माते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे आपल्या उत्पादनांचे सादरीकरण करतील. व्यापारी खरेदीदार; ज्यामध्ये भारतामधील ४०० शहरे आणि नगरांतील विक्रेते, होलसेलर, वितरक, कॉर्पोरेट भेटवस्तूंची खरेदी करणारे, इंटीरिअर डिझायनर व वास्तूविशारद यांनी अगोदरच भेट देण्यासाठी नोंदणी केली आहे. यामध्ये संपूर्ण भारतातील बहुतांशी अग्रेसर रिटेल चेन्स/विक्री शृंखलांचा समावेश आहे.

एचजीएच इंडिया २०२१, ची १० वी वर्धापनदिन आवृत्ती पुरवठादार आणि खरेदीदारांना न्यू नॉर्मलमध्ये त्यांचा व्यवसाय नव्याने वसवण्याकरिता सर्वोत्तम आरंभ उपलब्ध करून देणार आहे.

नाविन्यपूर्ण ▪ ट्रेंड्स ▪ उत्पादने ▪ स्त्रोत ▪ संधी

# सेवा आणि सुविधा

## एटीएम सुविधा

गेट क्र २ आणि गेट क्र ५ नजीक एटीएम सुविधा उपलब्ध, जिथून प्रदर्शक तसेच भेट द्यायला येणाऱ्यांना त्यांच्या सुविधेनुसार पैसे काढण्याची संधी.

## बिझनेस सेंटर

याठिकाणी प्रदर्शक आणि भेट द्यायला येणाऱ्यांना संगणक, इंटरनेट, कागदपत्रांचे मुद्रण, बिझनेस कार्डचे मुद्रण, स्कॅनिंग, फॅक्स आणि स्टेशनरी खरेदी इत्यादीकरिता बिझनेस सेंटरची निर्मिती करण्यात आली आहे... व्यापार प्रदर्शनाच्या कालावधीत (३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१) सकाळी ०९:०० – संध्याकाळी ०६:३० या सेवा सशुल्क सुरु राहतील.

## भाड्यावरील कार

प्रदर्शक आणि भेट देणाऱ्यांकरिता अधिकृत प्रवासी एजंट्स टॅमरिंड ग्लोबल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडकडून परवडणारे तसेच आलिशान कार चालकांसह एचजीएच इंडिया सुरू असताना संपूर्ण कालावधीत अथवा कोणत्याही दिवशी उपलब्ध राहील. बाहेरून भेट द्यायला येणारे तसेच प्रदर्शकांनी असुविधा होऊ नये म्हणून आगाऊ कारची नोंदणी करावी.

सर्व सविस्तर माहितीसाठी आणि बुकिंगकरिता कृपया हेमंत कारंडे यांच्याशी संपर्क करा, मोबाईल: +९१ ९६ १९४ ६९१८१,

टेलिफोन: +९१ (२२) ६६८० २५६६, ई-मेल: travel.hghindia@tamarindglobal.com

## कोविड-19 नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे

भारत सरकार आणि ग्रेटर नॉयडा स्थानिक प्रशासनाने नेमून दिलेल्या सर्व कोविड-१९ नियम व मार्गदर्शन तत्त्वांचे पालन एचजीएच इंडिया २०२१ मध्ये करण्यात येते. याठिकाणी भेट द्यायला येणारे तसेच प्रदर्शकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, तसे न केल्यास व्यापार प्रदर्शनाच्या ठिकाणी प्रवेश नाकारण्यात येईल. याठिकाणी शरीराचे तापमान घेण्यात येईल, हात निर्जंतूक करण्याची, हात धुण्याची सुविधा असेल, अँटीजेन व आरटी-पीसीआर टेस्ट, विलगीकरण कक्ष, वैद्यकीय खोली आणि रुग्णवाहिका कार्यक्रमाच्या ठिकाणी हजर असेल.

## कुरियर सेवा

प्रदर्शक आणि भेट द्यायला येणाऱ्यांकरिता व्यापारी प्रदर्शनाच्या कालावधीत कार्यक्रमस्थळावर कुरियर सेवा उपलब्ध राहील. माहिती कक्ष किंवा एचजीएच इंडिया संकेतस्थळावर वास्तविक ठिकाण शोधता येईल. उपलब्ध करून देण्यात आलेल्या कुरियर कक्षातून कुरियर पाकिटे पाठविता येतील.

## प्राथमिक साह्य

याठिकाणी भेट द्यायला येणारे आणि प्रदर्शक यांच्या आरोग्य आणि सुरक्षेला महत्त्व देत एचजीएच इंडियाच्या वतीने प्राथमिक साह्य आणि प्राथमिक वैद्यकीय सुविधेच्या व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याठिकाणी "प्राथमिक साह्य (फर्स्ट एड)" अशी पाटी असून हा कक्ष भेट द्यायला येणाऱ्यांची नोंदणी करण्यात येणाऱ्या हॉल ९ च्या जवळ आहे. कार्यक्रम स्थळावर पूर्ण वेळ म्हणजे सेटअप तयार करताना तसेच मूळ प्रदर्शन कालावधीत (३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१) दरम्यान रुग्णवाहिका उपलब्ध असेल. कोणतीही वैद्यकीय आपतकालिन स्थिती उद्‌भवल्यास, कृपया ड्युटीवर असलेल्या डॉक्टरांसोबत मोबाईल : +९१ ८८ २६१ ०४४२२ वर संपर्क साधा.

## हॉटेल आणि राहण्याची सुविधा

टॅमरिंड ग्लोबल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड हा एचजीएच इंडियाचा अधिकृत प्रवासी भागीदार असून एचजीएच इंडिया २०२१ च्या कार्यक्रम स्थळी इंडिया एक्स्पो सेंटरजवळ आणि अवतीभवती अनेक प्रकारचे व्यवसाय, आलिशान व बजेट हॉटेलसह सवलतीच्या दरात सेवा उपलब्ध करून देण्याचे मान्य केले आहे. काही हॉटेलकरिता मोफत शटल बस सेवा प्रदर्शन ठिकाणापासून ते ठिकाणापर्यंत पोहोचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. हॉटेल आरक्षण सुविधेचा लाभ घेण्यासाठी आमची वेबसाईट www.hghindia.com वरील 'ट्रॅव्हल' टॅबवर क्लिक करा. या टॅबवर एचजीएच इंडिया २०२१ चे नोंदणीकृत प्रदर्शक आणि भेट द्यायला येणारे हॉटेल्सची प्रोफाईल, स्टार रेटींग, उपलब्धता, दर, देऊ करण्यात येणाऱ्या सेवा, प्रदर्शनाच्या ठिकाणाहून अंतर आणि तत्सम माहिती 'ट्रॅव्हल अँड स्टे' सबलिंक वर क्लिक करून पहा. अधिक माहिती आणि बुकिंगकरिता कृपया संपर्क करा हेमंत कारंडे मोबाईल.: +९१ ९६ १९४ ६९१८१, टेलिफोन.: +९१ (२२) ६६८० २५६६, ई-मेल: travel.hghindia@ tamarindglobal.com

## सामान ठेवण्याची व्यवस्था

भेट द्यायला येणाऱ्यांची नोंदणी होणाऱ्या हॉल ९ आणि हॉल १५ जवळ सामान ठेवण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रदर्शनाच्या कालावधीत (३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१) दरम्यान सकाळी ०९:०० ते संध्याकाळी ०७.३० या वेळेत मोफत या सुविधांचा लाभ घेऊ शकतील.

## वाहनतळ (भेट द्यायला येणाऱ्यांकरिता)

इंडिया एक्स्पो सेंटरला भेट द्यायला येणाऱ्यांची वाहने उभी करण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इंडिया एक्स्पो सेंटरच्या गेट ३ वरून याठिकाणी प्रवेश असेल. या सुविधेचे व्यवस्थापन इंडिया एक्स्पो सेंटरद्वारे करण्यात येणार आहे. भेट द्यायला येणाऱ्यांकरिता असलेल्या वाहनतळात मालाने भरलेली वाहने उभी करता येणार नाही.

## प्रार्थनेची खोली

प्रदर्शनाच्या कालावधीत ३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१ दरम्यान धार्मिक प्रार्थनांकरिता हॉल ९ आणि हॉल १५ च्या परिसरात प्रार्थना खोली उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हॉलच्या परिसरात असलेल्या माहिती कक्षातून किंवा साईनेजवरून वास्तविक ठिकाण शोधणे शक्य होईल.

## शटल बस सेवा

एचजीएच इंडियाला भेट द्यायला येणारे आणि प्रदर्शकांच्या सोयीकरिता प्रदर्शनाच्या ठिकाणी आणि दिल्ली तसेच ग्रेटर नॉयडाच्या महत्त्वाच्या ठिकाणी मोफत शटल बस सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सेवा कार्यक्रम स्थळानजीक असलेली विमानतळे, रेल्वे स्थानके, हॉटेल आणि मेट्रो स्टेशनना जोडण्यात आल्या आहेत. यामध्ये दिल्लीतील आयजीआय एअरपोर्ट टर्मिनल टी१ आणि टी३, नवी दिल्ली रेल्वे स्थानक (अजमेरी गेटची बाजू), नवी दिल्ली मेट्रो स्थानक, निझामुद्दीन रेल्वे स्थानकचा समावेश आहे. हॉटेलवरून एचजीएच इंडियात येण्याकरिता शटल बस उपलब्ध असतील. www.hghindia.com वरील मेन्यू ट्रॅव्हल खालील "शटल बस शेड्यूल" सब मेन्यू मध्ये पिक अप आणि ड्रॉप सेवेचे प्रस्तावित वेळापत्रक उपलब्ध करून देण्यात आले आहे. ते माहिती कक्षावर, बसच्या आत आणि कार्यक्रम स्थळाच्या पिक-अप पॉईंटवर देखील उपलब्ध असेल.

क्राऊन प्लाझा आणि रेडीसन ब्ल्यू, जयपी ग्रीन्स आणि सवोय सूट्स, कनॉट प्लेस आणि लाजपत नगर, बॉटनिकल गोल्डन मेट्रो स्टेशन, परी चौक आणि नॉलेज पार्कवरून प्रदर्शनाच्या ठिकाणी येण्यासाठी आणि तिथून पुन्हा परतण्याकरिता शटल बसची सुविधा असेल.

## रेस्टॉरंट/कॅफेटेरिया

आयोजकांकडून प्रदर्शनच्या कालावधीत प्रदर्शन लावणारे तसेच भेट देणारे यांच्याकरिता मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याशिवाय, इंडिया एक्स्पो सेंटरच्या परिसरात असणारी रेस्टॉरंट/ कॅफेटेरियामधून पिण्याचे पाणी विकत घेता येईल.

३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१ या व्यापारी प्रदर्शनाच्या कालावधीत फूड कोर्ट, रेस्टॉरंट/ कॅफेटेरिया अनेक ठिकाणी कार्यान्वित राहतील. विविध ठिकाणी हॉलच्या बाहेरच्या भागात आऊटडोअर कॅफेटेरिया आणि फूड ट्रक कार्यान्वित असतील. सर्व प्रदर्शक, व्यापारी प्रदर्शनाला भेट देणारे तसेच व्हीआयपींकरिता एक्स्क्ल्युसिव्ह लाऊंज उभारण्यात आली आहेत, जिथे आदरातिथ्य आणि पेयपान उपलब्ध करून देण्यात येईल.

## टॅक्सी

दिल्ली महानगर प्रदेश मीटर आणि रेडियो टॅक्सी (कॉल-अ-टॅक्सी) सेवेची श्रेणी उपलब्ध करून देते. ऑटो हे वाहतुकीचे महत्त्वाचे आणि लोकप्रिय सार्वजनिक वाहतूक माध्यम असून ते टॅक्सीहून स्वस्त आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. या पट्ट्यात टॅक्सी, कॅब आणि अगदी अलीकडे ऑटो ऑनलाइन बुकिंगचा प्रघात आहे. हे प्रवासी पर्याय लागलीच उपलब्ध होत असल्याने यशस्वी ठरले आहेत. रेडियो टॅक्सी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय हवाई तळावरून आणि मध्य रेल्वे स्थानके (जिथे बाहेरगावाहून येणाऱ्या ट्रेन थांबतात- नवी दिल्ली, जुनी दिल्ली, हजरत निझामुद्दीन, आनंद विहार टर्मिनल, दिल्ली कंटोनमेंट इत्यादी) भाड्यावर घेता येतात.

तुम्ही जिथे आहात, तिथून दिवसभरात कधीही २४ तासांपासून तासाभराकरिता आगाऊ स्वरुपात खालील सेवा पुरवठादारांकडून रेडियो टॅक्सीची नोंदणी करू शकता. गुगल मॅप्सवर मार्ग शोधण्याची पद्धतही रुळली आहे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी कोणते विविध मार्ग आहेत, वेगवेगळ्या रस्त्यांवर असणारी वाहतुकीची बदलणारी स्थिती तपासता येते. तुम्ही इंडिया एक्स्पो सेंटरच्या गेट क्रमांक ७ पिक अप पॉइंटवरून ओला/उबर बुक करत असल्यास

**ओला कॅब्ज** (ॲप डाऊनलोड)
www.olacabs.com

**युबर कॅब्ज** (ॲप डाऊनलोड)
www.uber.com

**साखा कन्सल्टींग विंग्ज कॅब्ज**
+९१ ९९ ९९१९ ३००४ (महिलांकरिता खास)

## प्रवासी सेवा

एचजीएच इंडिया'चा अधिकृत प्रवासी एजंट टॅमरिंड ग्लोबल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड प्रदर्शक आणि इथे भेट द्यायला येणारे यांच्याकरिता व्यापक प्रवासी सेवा उपलब्ध करून देतात. यामध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय हवाई तिकीट, भाड्यावरील कार, हॉटेल आरक्षण आणि संपूर्ण भारतामधील मुख्य पर्यटन ठिकाणी पॅकेज टूर्सची नोंदणीचा समावेश आहे. दिल्ली एनसीआर भागात आणि त्याभोवती प्रवासाकरिता छोट्या स्वरुपाची पॅकेजही उपलब्ध करून देण्यात येतात. शेवटच्या क्षणी घाई आणि असुविधा होऊ नये याकरिता हॉटेलची बुकिंग तसेच तुमच्या नाय प्रवासी व्यवस्था आगाऊ स्वरुपात करण्याचा सल्ला देण्यात येतो.

www.hghindia.com वरील ट्रॅव्हल टॅबमार्फत ट्रॅव्हल एजंटपर्यंत पोहोचता येते. एचजीएच इंडियाकडे अधिकृत प्रवासी एजंटद्वारे ट्रॅव्हल कक्ष उपलब्ध करून देण्यात आला असून प्रदर्शक आणि भेट देणारे ३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१ या कालावधीत सर्व प्रवासी सेवांचा लाभ घेऊ शकतील.

# इटली ॲट एचजीएच इंडिया २०२१

भारतात सर्वोत्तम मेड इन इटलीचा प्रचार करण्यासाठी नवी दिल्लीतील द इटालियन ट्रेड कमिशनने यंदाच्या एचजीएच इंडिया २०२१ मध्ये सहभाग घेतला आहे. याच्या १० व्या वार्षिक आवृत्तीत होम टेक्सटाईल, होम डेकोर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूचे प्रदर्शन लावण्यात येत असून त्याठिकाणी भारतामधील ४०० शहरे आणि नगरांमधून आंतरराष्ट्रीय प्रदर्शक व्यापार आणि संस्थात्मक खरेदीदार दाखल होणार आहेत.



**अलेसॅन्ड्रो लिबेराटोरी,**

*ट्रेड कमिशनर / इटालियन ट्रेड एजन्सीचे डायरेक्टर – नवी दिल्ली को-ऑर्डीनेटर फॉर इंडिया, बांगलादेश, श्रीलंका*

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाने टाळेबंदी लागली आणि मोठा विराम अनुभवायला मिळाला. जगभरातील व्यवसायांना अनिश्चिततेने झटका दिल्यानंतर टप्प्याटप्प्याने बाजारपेठा उघडू लागल्या. या अनिश्चित वातावरणात इटालियन सहभाग दोन देशांमधील द्विपक्षीय भागीदारी आणि व्यापार बळकट करणार आहे. फर्निचर क्षेत्रासाठी करण्यात आलेली भागीदारी सशक्तीकरणाची पावती देणारी ठरेल.

भारतात फर्निचरचा पुरवठा करणारा इटली हा ४ थ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जानेवारी ते ऑगस्ट २०२१ दरम्यान भारतात इटलीमधून सुमारे $44.7 मिलियन अमेरिकन डॉलरचे फर्निचर आयात करण्यात आले. मागील वर्षी याच कालावधीची तुलना करता ४३.६% वृद्धी पाहायला मिळाली.

"मेड इन इटली" करिता नाविन्यपूर्णता, स्टाईल, गुणवत्ता, लावण्य आणि हाय टेक डिझाईन हे समानार्थी शब्द आहेत. मध्यमवर्गीय भारतीय ग्राहक वर्गाला या शब्दांची भुरळ पडली आहे. इटलीचे डिझाईन क्षेत्रात वर्चस्व असल्याने भारतीय घरांना चालना देताना सौंदर्यावर भर राहणार आहे.

इटलीने ६ इटालियन कंपन्यांसह कॅटलॉग डिस्प्लेच्या माध्यमातून सहभाग घेत अभिजात आरेखनासोबतच म्युरानोचे डेकोरवेअर, लहान मुलांचे फर्निचर ते आलिशान फिटनेस, महत्त्वपूर्ण ठरते, कोविड-पश्चात कालावधी पाहिल्यास लोक आरोग्याबाबत अधिक सजग झाले आहेत आणि ते आपला बहुतांशी वेळ प्रियजनांसह घरातच वेळ घालवत आहेत.

इटालियन बूथमध्ये सहभागी होणाऱ्या इटालियन कंपन्यांमध्ये मल्टीडिझाईन, फेरेरो लेग्नो, वास्त्रेदो, वेव्ह म्यूरानो ग्लास, पेरले दे'अते दी तूरनिओत्तो चिआरा आणि मोडेनीज इंटेरिअर्सचा सहभाग आहे.

भारत देश ही जगातील वेगाने वाढणारी आणि बळकट अर्थसत्ता असल्याचा इटालियन कंपन्यांना दृढ विश्वास वाटतो, औद्योगिक यंत्रे, डिझाईन, फॅशन आणि अन्नपदार्थ निर्यात करण्याची चांगली क्षमता भारतात आहे. इटली हा युरोपातील दुसरा सर्वात मोठा निर्माता असल्याचे भारतीय कंपन्या मानतात. इटली ही जगाची डिझाईन विषयक राजधानी आहे.


त्यामुळे आगामी काळात भारत आणि इटालियन कंपन्यांमध्ये भागीदारीला अधिकाधिक चालना मिळेल. आमची कोविड-पश्चात भागीदारी ही नव्या आरंभाचे सुचिन्ह आहे.
















# वर्ल्ड ऑफ स्लिप

वर्ल्ड ऑफ स्लिप 2021 हा एचजीएच इंडिया आणि आयएसपीएफचा उपक्रम आहे. झोपेसाठी उपयुक्त असलेल्या भारतीय आणि जगभरातील उत्पादनांचे आणि ट्रेंड्सचे प्रदर्शन भरवून तुम्हाला योग्य झोपेसाठी लागणार्या उत्पादनांच्या निवडीवर परिणाम करणारे विविध व्यक्तिगत घटक समजावून सांगायला मदत करते आणि ग्राहकांना चांगली माहिती पुरविते.

उद्योग आणि ग्राहक यामधील 'तुम्ही' हा महत्त्वाचा दुवा असल्याने झोपेशी संबंधित उत्पादने विकण्यापूर्वी ग्राहकांना झोपेचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी तुम्हाला उत्तम झोपेच्या उपाययोजना समजावून सांगणे हे वर्ल्ड ऑफ स्लिपचे उद्दिष्ट आहे.

**झोपेला तंत्रज्ञानाची जोड**

आज, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. साध्या, परवडणार्या आणि सुलभ मार्गाने नवे व्यत्यय लोकांना त्यांच्या सर्वांगीण झोपेच्या अनुभवात वाढ, निरीक्षण, मोजमाप करण्यासाठी मदत करत आहे.

तुम्ही सभोवतालचे निरीक्षण करून अनेक उदाहरणे शोधू शकता-





- झोपेचे निरीक्षण करणारी उत्पादने
- स्मार्ट उश्या आणि उपकरणे
- जेव्हा तुम्ही झोपता तेव्हा काय बरोबर आणि काय चूक आहे ते बघून चांगली पकड देणारे आयओटी-बेड्स
- वापरकर्त्याला व्यक्तिगत अनुभव देऊ करणार्या बुद्धिमान गाद्या आणि पलंग
- घोरणे आणि झोपेशी संबंधित इतर विकार नियंत्रणात ठेवाणारी साधने

**विक्रेत्याची भूमिका**

झोपेची उत्पादने विकणारा रिटेलर हा एखाद्या विक्रेत्यापेक्षा वेगळा असतो. रिटेलर हा ग्राहकाचा एक विश्वासू सल्लागार, उत्पादन तज्ज्ञ आणि वापरकर्त्याला त्याच्या विशिष्ट गरजांनुसार, समस्या आणि आव्हानांनुसार झोपेची योग्य उत्पादने निवडण्यासाठी सक्षम करणारा मदतनीस असतो.

ग्राहकाने काय खरेदी करावे, का खरेदी करावे आणि स्वत:चा झोपेचा अनुभव कसा चांगला करावा याचे मार्गदर्शन रिटेलरच करतो. माहितगार आणि सहानुभूतीशील रिटेलर ग्राहकाला उत्पादनांच्या किंमतीमधील फरकाची जाणीव करून देऊ शकतो. उदाहरणार्थ, आरामदायी आणि आरोग्यासाठी रु. 10,000/- आणि रु. 20,000 दरम्यानच्या गाद्या. किंवा कमी जाडीच्या किंवा जास्त जाडीच्या गाद्यांमुळे आरामदायी अनुभवात कसा फरक पडतो हे समजावणे.

एखादी टूथपेस्ट खरेदी करण्यापेक्षा गादी खरेदी करणे हे किती गंभीर आहे हे समजून घेण्याकरीता वापरकर्त्यासाठी ऑफलाईन किरकोळ दुकान हेच सर्वोत्तम ठिकाण आहे. चांगल्या आरोग्याच्या रुपात याची परतफेड होत असल्याने यासाठी निवांत वेळ, एकाग्रता, वैयक्तिकरण आणि प्रयत्नांची गरज असते.

**भेट द्यायला येणाऱ्यांचे रजिस्ट्रेशन**
व्यापारी भेटी देणारे!
**रु १,०००/- प्रवेश शुल्काची बचत** करण्याकरिता **२० नोव्हेंबर २०२१** पर्यंत
www.hghindia.com वर
ऑनलाइन नोंदणी करावी


साह्य करण्याकरिता कृपया संपर्क करा
**अमर शर्मा:** +९१ ९९ ६७६ ००२८६
ईमेल: visitors@hghindia.com


# ट्रेंड्स २०२१-२२


एचजीएच इंडिया ट्रेंड्स २०२१-२२ मध्ये भारतीय गृह बाजारातील या कालावधीतील महत्त्वाचे ट्रेंड्सचे प्रदर्शन करण्यात येईल. दर वर्षी, एचजीएच इंडियातर्फे घराच्या फॅशनमध्ये आणि जीवनशैली कलामध्ये भारतीय बाजारात रंग, डिझाईन, साहित्य आणि स्टाईल कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहेत, याबाबत भविष्यवाणी केली जाते. विकसित होणारे रंग, डिझाईन्स आणि साहित्य याचा सर्वसमावेशक सार या ट्रेंड्समध्ये दिसून येतो आणि त्यातून भारतीय गृह उत्पादन बाजारातील नव्या ग्राहक मागणीसाठी एक ठोस मार्गदर्शन मिळते. सर्वांसाठीच आव्हानात्मक ठरलेल्या गेल्या वर्षामुळे समाज अचानकपणे सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक घटकांमधील बदलांना सामोरा गेला. या वर्षीच्या ट्रेंड्समध्ये याचाच विचार करण्यात आला आहे.


अनेक महिने घरी बसून काढावे लागल्याने ग्राहकांच्या आयुष्यातील घराचे स्थान नव्याने समजले आहे. काम, खेळ, विश्रांती किंवा नवी उमेद गोळा करणे या सगळ्या कामांचे केंद्रस्थान म्हणजे घर. ग्राहक त्यांच्या घराला घरपण देत आहेत. हा प्रेमाचा प्रवास आहे आणि स्वत:च्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यात बघण्यासाठी आणि आपला भाव आनंदी करण्यासाठी घरातील डिझाईन, रंग आणि साहित्याची निवड तसेच उत्पादने यांना अतिशय महत्त्व आले आहे.

एचजीएच इंडिया ट्रेंड्स फॉर २०२१-२२ ची रचना अनुभवी जर्मन स्थित डिझाईन गटातर्फे करण्यात आलेल्या संशोधनाच्या आधारे करण्यात आली आहे. **“ऑनवर्डस, रिसेट टूगेदर!”** भारतीय बाजारातील २०२१-२२ साठीचे ट्रेंड्स हे होम टेक्सटाईल्स, गृह सुशोभीकरण, गृहोपयोगी वस्तू आणि भेटी अशा संपूर्ण गृह श्रेणींसाठी लागू असतील. **“ऑनवर्डस, रिसेट टूगेदर!”** या ट्रेंड्सची **होम अँड रुट्स, गुड व्हाईब्ज ऑन, ग्रीन एन्फ्ल्यूएन्सर** आणि **गोल्डन अवर्स** अशा चार उप-गटात विभागणी करण्यात आली आहे.




एचजीएच इंडिया २०२१ च्या हॉल १५ मध्ये ट्रेंड फोरमतर्फे प्रत्यक्ष उत्पादनांच्या माध्यमातून या ट्रेंड्सच्या वापराच्या विविध कल्पनांचे प्रदर्शन सादर करण्यात येणार असल्याने ब्रँड्स, रिटेलर्स, उत्पादक, इंटेरिआर डिझायनर्स आणि ज्यांना स्पर्धेत अग्रणी रहायचे आहे अशा उद्योगक्षेत्रासाठी हे अवश्य भेट देण्याचे ठिकाण आहे.

नोंदणीकरिता: www.hghindia.com मुंबई: दूरध्वनी. +९१ (२२) २४२१ ४१११, दिल्ली: दूरध्वनी. +९१ (११) २५७२ ४१११ ईमेल: visitors@hghindia.com